वाचा :-

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2016/ प्र.क्र.117/पंरा-3 दिनांक 6 एप्रिल, 2016.

2) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सान्यावि-2015/प्र.क्र.163(4)/बांधकामे दिनांक 12 एप्रिल, 2016.

3) मा.राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान, महाराष्ट्र राज्य यांचेकडील आदेश क्र.रा.गां.पं.स.अ./688/2016 दिनांक 11/4/2016.

4) या कार्यालयाची मंजुर टिपणी दि.13/4/2016

---

क्र.ग्रापं/5/कावि/ 3862 /2016
ग्रामपंचायत विभाग,
दिनांक 13/4/2016

**आदेश :-**

ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक 6 एप्रिल, 2016 नुसार, दिनांक 14 एप्रिल, 2016 (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती) ते दिनांक 24 एप्रिल,2016 (राष्ट्रीय पंचायत राज दिवस) या कालावधीत **"ग्राम उदय से भारत उदय अभियान"** राबववयाचे आहे. "ग्राम उदय से भारत उदय अभियान" पुढील टप्प्यात राबवावयाचे आहे.

1) सामाजिक सलोखा व अभिसरण कार्यक्रम : दिनांक 14 ते 16 एप्रिल, 2016.

2) ग्राम किसान सभांचे आयोजनः दिनांक 17 त 20 एप्रिल, 2016.

3) राष्ट्रीय पंचायत राज दिनाचे औचित्य साधून ग्रामसभांचे आयोजनः दिनांक 21 ते 24 एप्रिल,2016.

4) मा.पंतप्रधान महोदयांचे ग्रामसभांना उद्देशून भाषण : दिनांक 24 एप्रिल, 2016.

दिनांक 14 ते 17 एप्रिल, 2016 या कालावधीत सामाजिक सलोखा व अभिसरण कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायतींमध्ये आयोजित करावयाच्या कार्यक्रमासाठी सामाजिक न्याय विभागाकडून प्रति ग्रामपंचायत रु.5000/- या प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे शासन निर्णय दि.६.४.२०१६ मध्ये नमुद आहे.

सामाजिक सलोखा व अभिसरण कार्यक्रमाचे ग्रामपंचायत स्तरावर आयोजन करणेकरिता प्रति ग्रामपंचायत रु.5000/- प्रमाणे निधी राज्य प्रकल्प संचालक , राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे वर्ग करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक 12.4.2016 अन्वये निर्देश देण्यात आले आहेत.

त्यानुसार, मा.राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश क्र.रा.गां.पं.स.अ./688/2016 दिनांक 11/4/2016 नुसार सातारा जिल्हयातील 1499 ग्रामपंचायतींसाठी प्रति ग्रामपंचायत रु.5000/- प्रमाणे एकूण रक्कम रु. 74,95,000/- इतका निधी मुख्य लेख्या व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांचे खात्यावर RTGS द्वारे वर्ग करण्यात आला असून सदर निधी ग्रामपंचायतींना वर्ग करणेबाबत आदेश आहेत.

त्यानुसार, उपरोक्त आदेशान्वये प्राप्त झालेला निधी रक्कम रु. 74,95,000/- सातारा जिल्हयातील 1499 ग्रामपंचायतींना वितरीत करणेसाठी गट विकास अधिकारी पंचायत समिती ..(सर्व) जि.सातारा यांचेकडे खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे या आदेशाद्वारे RTGS द्वारे वर्ग करणेत येत आहे.

| अ.क्र. | पंचायत समिती | ग्रामपंचायतींची संख्या | वितरीत केलेला निधी रु.5000 प्रति ग्रामपंचायत प्रमाणे. |
|---|---|---|---|
| 1 | सातारा | 194 | 9,70,000/- |
| 2 | कोरेगाव | 141 | 7,05,000/- |
| 3 | खटाव | 134 | 6,70,000/- |
| 4 | माण | 96 | 4,80,000/- |
| 5 | फलटण | 128 | 6,40,000/- |
| 6 | खंडाळा | 64 | 3,20,000/- |
| 7 | वाई | 99 | 4,95,000/- |
| 8 | जावली | 126 | 6,30,000/- |
| 9 | महाबळेश्वर | 79 | 3,95,000/- |
| 10 | कराड | 199 | 9,95,000/- |
| 11 | पाटण | 239 | 11,95,000/- |
| | **एकूण** | 1499 | 74,95,000/- |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे निधी रक्कम रु.74,95,000/- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांनी RTGS द्वारे तात्काळ गट विकास अधिकारी यांचेकडे वर्ग करण्याची कार्यवाही करावी.

अटी व शर्ती :-

1) गट विकास अधिकारी यांनी सदरचा निधी प्रति ग्रामपंचायत रु.5000/- प्रमाणे तात्काळ त्यांचे तालुक्यातील ग्रामपंचायतींना RTGS द्वारे वर्ग करावा.

2) ग्रामपंचायतींनी सदर निधीचा विनियोग ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक 6 एप्रिल, 2016, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक 12.4.2016 मधील सूचनांनुसार करणे आवश्यक आहे. याबाबत गट विकास अधिकारी यांनी सर्व ग्रामपंचायतींना सूचना निर्गमित कराव्यात.

3) निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे.

लेखाशीर्ष-२० संकीर्ण, २१अ, संगणक,साक-५-२०३९अ "ग्राम उदय से भारत उदय अभियान."

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,सातारा.

प्रति : मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सातारा

प्रति :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती ..... सर्व जि.सातारा